सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १६९ | गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ | पाने : ४

अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

# ताडेपुरा परिसर अवमानाच्या निषेधार्थ पालिकेत 'डफडे बजाओ'

## उपनगराध्यक्षांनी माफी मागावी, 'नमो गार्डन' उभारण्याची रहिवाशांची मागणी





*अमळनेर : ताडेपुरा परिसर अवमानाच्या निषेधार्थ बुधवारी नागरिकांनी पालिकेत केलेले डफडे बजाओ आंदोलन. दुसऱ्या छायाचित्रात आंदोलनाप्रसंगी पालिकेत झालेली गर्दी.* ( सर्व छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील काही भागांना कमी लेखणे, तेथे नागरिक जाणार नाहीत, असे सार्वजनिकपणे चर्चा करणे आणि ताडेपुरा तलाव परिसराला गटारींचे पाणी साचलेला भाग म्हणून उपनगराध्यक्षांनी हिणवणे हा प्रकार म्हणजे या परिसरातील प्रत्येक नागरिकाचा उघडपणे अपमान आहे. तलावात गटारीचे पाणी साचते, असे जर खरे असेल तर त्याचे शुद्धीकरण व योग्य व्यवस्थापन करणे ही जबाबदारी पालिकेची नाही तर कुणाची? एखादा भाग दुर्लक्षित ठेवायचा, सुविधा द्यायच्या नाहीत आणि नंतर त्यालाच अस्वच्छ म्हणून हिणवायचे, ही भूमिका लोकशाहीला शोभणारी नाही. या अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ ताडेपुरा परिसरातील नागरिकांनी बुधवार, दि. ११ मार्च रोजी पालिकेत 'डफडे बजाओ' आंदोलन केले. या आंदोलनात महिलांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. याप्रसंगी आंदोलनकर्त्यांनी पालिका आवारात



*पालिकेत महिलांनी केलेले ठिय्या आंदोलन.*

याप्रसंगी ठिय्या मांडत उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांनी पालिकेत येऊन नागरिकांची जाहीर माफी मागावी, अशी जोरदार मागणी केली.

पालिकेच्या माध्यमातून एक कोटी रुपये निधीतून 'नमो गार्डन' उभारण्याचा प्रस्ताव जाहीर करण्यात आला आहे. मात्र, यासंदर्भात ताडेपुरा तलाव परिसराविषयी करण्यात आलेल्या अवमानजनक वक्तव्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. ताडेपुरा परिसराला गटारीचे पाणी साचलेला भाग व महिलांसाठी असुरक्षित असे संबोधून शहरातील लोक तेथे जाणार नाहीत, असे वक्तव्य उपनगराध्यक्षांनी केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने पालिकेत जमले.

या प्रकरणी उपनगराध्यक्षांनी तत्काळ जाहीर माफी मागावी तसेच 'नमो गार्डन' ताडेपुरा तलाव परिसरातच उभारण्याचा निर्णय अधिकृतरित्या जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय तलाव शुद्धीकरण, स्वच्छता आणि परिसराच्या विकासासाठी स्वतंत्र निधी व वेळापत्रक जाहीर करण्याची मागणीही करण्यात आली. ताडेपुरा तलाव सुशोभीकरणासाठी आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नातून सुमारे पाच कोटी रुपये निधी मंजूर झाला असून, 'नमो गार्डन' संकल्पनाही त्यांच्या प्रयत्नांचे फलित आहे. मात्र सध्याची सत्ताधारी मंडळी त्यावर श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

दरम्यान, आंदोलन सुरू असताना पालिकेत उपस्थित असलेल्या काही नगरसेवकांनी मध्यस्थी करत आंदोलनकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आंदोलनात सहभागी झालेले महिला व पुरुष अतिशय तीव्र आक्रोशात दिसून आले. काही वेळानंतर आंदोलनकर्ते मुख्याधिकाऱ्यांकडे गेले असता मुख्याधिकाऱ्यांनी त्यांना समजावून सांगत या विषयावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, ताडेपुरा परिसराचा अपमान सहन केला जाणार नाही, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. यावेळी नगरसेविका शोभाबाई गढरे तसेच दुर्गेश पाटील, भूषण लोहार, चेतन पाटील, रोहन पाटील, ललित पाटील, अमर पाटील, राहुल गरुड, राज कुंभार आदी उपस्थित होते.



पर्यावरण संवर्धनासाठी मंजूर झालेला निधी त्याच ठिकाणी वापरला जाईल. कोणत्याही परिस्थितीत हे काम रद्द होणार नाही, अशी खात्री नागरिकांना देण्यात आली आहे. तसेच 'नमो गार्डन' आणि तलाव सुशोभीकरण ही दोन वेगवेगळी कामे असून, ती दोन वेगवेगळ्या विभागांच्या शासन निर्णयांनुसार मंजूर झालेली आहेत, याबाबतचा संभ्रमही दूर करण्यात आला आहे. याशिवाय उपनगराध्यक्षांनी ताडेपुरा भागाबाबत केलेल्या वक्तव्यामुळे निर्माण झालेला गैरसमज चर्चेतून दूर करण्यात येईल, असेही आश्वासन संबंधितांना देण्यात आले. नगरपालिकेतर्फे करण्यात येणाऱ्या कामांबाबत नागरिकांनी गैरसमज टाळावा.

**– गणेश शिंदे**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, अमळनेर.**



माझे लक्ष बहुजन समाजाकडे असून, त्यांच्या विकासाचेच माझे काम आहे. विद्यमान आमदारांनी ताडेपुरा येथे नियोजन केले होते आणि त्या ठिकाणी सध्या चार ते पाच कोटी रुपयांच्या कामांना सुरूवातही झाली आहे. हे काम आमदार निधीतून सुरू आहे. एकाच जागेवर दोन वेगवेगळे निधी वापरता येत नाहीत, हे त्यांनाही माहीत आहे. माझा उद्देश एकच आहे की हे ठिकाण शहराच्या मध्यवर्ती भागात झाले पाहिजे. काहींनी गैरसमज पसरवून नागरिकांना भडकावले आणि बनवाबनवी करून मोर्चा काढण्यात आला. नागरिकांची दिशाभूल करण्यात आली.


**– प्रशांत निकम**
**उपनगराध्यक्ष, अमळनेर.**

### दिनविशेष
१२ मार्च

- कृष्णाजी प्र. खाडिलकरांच्या संगीत मानापमानाचा पहिला प्रयोग झाला.
- महात्मा गांधींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी २०० मैलांची दांडी यात्रा सुरू केली.
- सरकारी नोटांवर यापुढे महात्मा गांधींचे चित्र असेल असा सरकारतर्फे निर्णय घेण्यात आला.
- ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि पर्यावरणवादी सुंदरलाल बहुगुणा यांना यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# पिंपळे रोड प्रभाग ८ मध्ये पालिकेतर्फे अशुद्ध पाणीपुरवठा

## व्हॉल्वच्या दुरवस्थेमुळे नळातून मिळतेय गटारीचे मिसळलेले पाणी

*अमळनेर : पिंपळे रोड प्रभाग ८ मधील विविध ठिकाणच्या व्हॉल्वची झालेली दुरवस्था.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील पिंपळे रोड परिसरातील प्रभाग क्रमांक ८ मध्ये पालिकेतर्फे केल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाणीपुरवठ्यात विविध ठिकाणी असलेल्या व्हॉल्वच्या दुरवस्थेमुळे त्यात गटारीचे पाणी मिसळले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे पाण्याचा तीव्र दुर्गंधीयुक्त वास येत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संताप व्यक्त होत आहे. पाण्यात गटारीचे पाणी मिसळत असल्याने नागरिकांसमोर आरोग्याचा गंभीर निर्माण प्रश्न होण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार गेल्या काही दिवसांपासून पालिकेतर्फे नळातून होणाऱ्या पुरवठ्यात पाण्याची असह्य दुर्गंधी येत असून, हे पाणी पिण्यास किंवा वापरण्यासाठी अयोग्य आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी लागत आहे. या गंभीर समस्येबाबत अनेकवेळा नगरपालिकेकडे तक्रारीही करण्यात आल्या आहेत. मात्र, पालिकेकडून अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दरम्यान, पिंपळे रोड परिसरातील नाल्याची काही दिवसांपूर्वी साफसफाई करण्यात आली असली, तरी त्यातून काढलेला कचरा मागील आठ दिवसांपासून तसाच पडून असल्याचेही समोर आले आहे. याबाबत पालिकेच्या आरोग्य विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही सदर कचरा उचलण्यात येत नसल्याचा आरोप नगरसेवक सचिन पाटील यांनी केला आहे. नाल्यातील कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असल्याने रोगराई पसरू शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

नगराध्यक्ष स्वतः डॉक्टर असताना शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची टीका नगरसेवक सचिन पाटील यांनी केली आहे. नगराध्यक्ष केवळ रबरी शिक्का ठरले असून, त्यांचे रिमोट कंट्रोल नंदुरबारमधून चालते. तेथून जसे आदेश येतील तसेच येथे काम केले जात आहे. पिंपळे रोड परिसरातील नाल्यातील कचरा तत्काळ उचलून पाणीपुरवठ्याच्या समस्येवरही पालिकेतर्फे दोन दिवसांच्या आत ठोस उपाययोजना करण्यात यावी अन्यथा नागरिकांसह आगळेवेगळे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नगरसेवक पाटील यांनी दिला आहे.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# शेतकऱ्यांच्या मालमोजणीत पापाचा प्रकार उघड

## मंगरूळ येथील आर. के. फूड्स कंपनीला बाजार समितीने केले 'सील'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील मंगरूळ येथील आर. के. फूड्स ही कंपनी शेतकऱ्यांचा गहू खरेदी करते. मात्र, या प्रक्रियेत संबंधित कंपनी मापात पाप करीत असल्याचा प्रकार उघडकीस आला. त्यामुळे कृषी बाजार समितीने सदर कंपनीला बुधवार, दि. १० मार्च रोजी 'सील' केले आहे. यासंदर्भात संतप्त शेतकऱ्यांनी काही वेळ मंगरूळ येथे धुळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर रास्ता रोको आंदोलनही केले.



*अमळनेर : शेतकऱ्यांच्या मालमोजणीत पापाचा प्रकार उघडकीस आल्यानंतर तालुक्यातील मंगरूळ येथील आर. के. फूड्स कंपनीला 'सील' केल्याप्रसंगी उपस्थित कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, संचालक शरद पाटील, वृषभ पारख, प्रकाश वाणी, योगेश वाणी, सचिव डॉ. उन्मेष राठोड, संदीप पाटील, सुनील पाटील, योगेश महाजन, डिगंबर पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम आदी.*

तालुक्यातील सोनखेडी येथील दीपक देविदास पाटील यांनी आपला गहू मंगरूळ औद्योगीक वसाहतीतील आर. के. फूड्स या कंपनीत विक्रीसाठी आणला होता. त्यांचा माल ५० ते ५५ क्विंटल अपेक्षित असताना कंपनीने वजन केले असता तो केवळ ४१ क्विंटल मोजला; तर गंगापुरी येथील रवींद्र विठ्ठल पाटील यांचाही गहू प्रत्यक्ष वजनापेक्षा कमी मोजण्यात आला. वजनात तफावत करून मापात पाप करण्याचा हा प्रकार शेतकऱ्यांच्या लक्षात आल्याने संबंधित शेतकऱ्यांनी धुळे रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन केले. यामुळे काही वेळ वाहतूक खोळंबली. त्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, संचालक शरद पाटील, वृषभ पारख, प्रकाश वाणी, योगेश वाणी, सचिव डॉ. उन्मेष राठोड, संदीप पाटील, सुनील पाटील, योगेश महाजन, डिगंबर पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, हवालदार काशिनाथ पाटील, सागर साळुंखे, प्रशांत पाटील, सिद्धांत शिसोदे, पोलीसपाटील भागवत पाटील घटनस्थळी पोहोचले. वाहतूक सुरळीत केल्यानंतर सर्वांसमक्ष बाजार समिती सभापती व कर्मचाऱ्यांनी आर. के. फूडस् कंपनीच्या काट्यावर वजन केले असता २०० क्विंटल वजन फक्त ९० क्विंटल मोजले गेले आणि १०० क्विंटलचे फक्त ४० क्विंटल मोजले गेले. ही मोठ्या प्रमाणातील तफावत लक्षात आल्याने उपस्थितांनी याबाबत प्रचंड संताप व्यक्त केला. शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट होत असल्याचा हा प्रकार तालुकाभर वाऱ्यासारखा पसरला. विशेष म्हणजे वजन-मापे निरीक्षकानी १३ जानेवारी २०२६ रोजी या कंपनीतील वजनकाटा व मापे पास केली होती.

दरम्यान, याबाबत बाजार समितीचे सभापती अशोक पाटील यांनी हे प्रकरण वांधा कमिटीसमोर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न केला जाईल. तसेच आतापर्यंत किती लोकांची फसवणूक झाली याचीही चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही सांगितले.

# थकबाकीदार २३ नागरिकांचे नळ कनेक्शन तोडले

## अमळनेर पालिकेतर्फे वसुली मोहिमेंतर्गत कारवाई

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : वारंवार मागणी करून नोटिसा देऊनही थकबाकीची रक्कम न भरणाऱ्या येथील २३ नागरिकांचे नळ कनेक्शन बुधवार, दि. ११ मार्च रोजी पालिकेतर्फे तोडण्यात आले. पालिकेतर्फे धडक वसुली मोहिमेंतर्गत संबंधितांवर ही कारवाई करण्यात आली आहे. येथील ढेकू रोडवरील लक्ष्मीनगर व गुलमोहर कॉलनी या भागांतील नागरिकांकडे पालिकेचे पाणीपट्टी करापोटी सुमारे दहा लाख रुपये थकीत होते. मार्चअखेरचे केवळ पंधरा-वीस दिवस राहिले असतानाही काही नागरिकांकडे जवळपास पाच कोटींची थकबाकी आहे. त्या पार्श्वभूमीवर पालिकेने यापूर्वी संबंधितांना नोटिसा बजावल्या तसेच कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटूनही थकीत रक्कम भरणा करण्याचे आवाहन केले.

पान २ वर...

थकबाकीदार नागरिकांनी तातडीने पालिकेच्या कराच्या थकीत रकमेचा भरणा करावा अन्यथा गाळे सील करणे, नळ कनेक्शन तोडणे, मालमत्तांवर बोजा चढविणे आदी प्रकारची कारवाई केली जाईल.

**– गणेश शिंदे**
**मुख्याधिकारी, नगर परिषद, अमळनेर.**

शहरातील अनेक नागरिकांचे बोगस नळ कनेक्शन असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याची देखील शोधमोहीम सुरू आहे. नागरिकांनी अपमानित होऊन कारवाई ओढवून घेण्यापेक्षा नळ कनेक्शन नियमित करून घ्यावे तसेच थकबाकीदारांनी नियमित करभरणा करावा.

**– डॉ. परिक्षीत बाविस्कर**
**नगराध्यक्ष, अमळनेर.**

## संपादकीय

# महाराष्ट्रातील गुणवत्तेचा गौरव

देशाची केंद्रासह सर्व राज्यांमधील प्रशासन व्यवस्था काटेकोरपणे चालवायची असेल, तर उत्तम दर्जाचे अधिकारी आवश्यक असतात. भारतात संसदीय लोकशाही जरी असली आणि लोकशाहीत लोकप्रतिनिधी निवडून येण्यासाठी निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जातात. देशाचा राज्यकारभार लोकप्रतिनिधीमार्फत चालवला जातो, असे आपण कितीही म्हणत असलो तरी या सगळ्या राज्यकारभाराचा पाया नोकरशाही असते. म्हणजेच उत्तम दर्जाची प्रशासन व्यवस्था ही लोकशाहीची मूलभूत गरज मानली गेली आहे. संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका यांच्या समन्वयाने संसदीय लोकशाही व्यवस्था चांगल्या पद्धतीने काम करू शकते. विशेषतः केंद्र आणि राज्यांमधील वेगवेगळ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी किंवा संसद विधिमंडळामध्ये जाहीर होणाऱ्या योजना असतील किंवा केले जाणारे वेगवेगळे कायदे असतील त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता भक्कम स्वरूपाचे प्रशासन गरजेचे ठरते. कोणता कायदा आवश्यक आहे त्या कायद्याची रचना कशी असली पाहिजे. त्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप कसे असू शकेल. यापासून ते वेगवेगळ्या योजना किंवा सरकारी निर्णय थेट गावखेड्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासकीय कारभार कार्यक्षम आणि गतिमान असणे आवश्यक मानले गेले आहे. यासाठीच भारतीय प्रशासन सेवा म्हणजेच इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस आणि भारतीय पोलीस सेवा यांच्या माध्यमातून अतिशय कठोर स्वरूपाच्या परीक्षा घेतल्या जातात. त्यात उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या भारतीय प्रशासन सेवेमध्ये सामावून घेतले जाते. यंदाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या आयएएसच्या परीक्षांसाठी जवळपास लाखभर विद्यार्थी देशभरात बसले होते. त्यापैकी केवळ ९ हजार ५८ विद्यार्थीच उत्तीर्ण झाले. आणि यामध्ये जवळपास ६० विद्यार्थी महाराष्ट्राचे आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण होणे तितकेसे सोपे नसते. पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होण्याची संधी देशभरातून एखाद्याच्याच नशिबी येते. ९९ टक्के विद्यार्थ्यांना अनेक प्रयत्न करून मगच ही परीक्षा उत्तीर्ण होण्याची संधी मिळते. अशा या बुद्धिमत्तेची, कार्यक्षमतेची, निर्णयक्षमतेची कसोटी पाहिल्या जाणाऱ्या परीक्षेत उत्तीर्ण होता यावे म्हणून विद्यार्थी परिश्रमही घेत असतात.

गेल्या काही वर्षातील भारतीय प्रशासन सेवेच्या परीक्षांमधील महाराष्ट्राचा वाढता टक्का हा खूपच समाधानकारक ठरतो. साधारणपणे गेल्या वीस वर्षांपासून हा बदल दिसून येत आहे. त्यापूर्वी या परीक्षेच्या वाटेला मराठी विद्यार्थी फारसे जातच नव्हते. दिल्ली, बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा, कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र या राज्यांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने आयएएस होण्यासाठी प्रयत्न करीत राहिले आणि यशस्वीही झाले. आजही देशभरातील आयएएस अधिकाऱ्यांच्या यादीवर नजर फिरवली तर त्यात मराठी नावे फारच कमी प्रमाणात आढळतात. अगदी आपल्या महाराष्ट्रातील आयएएस अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमध्येसुद्धा मराठी अधिकाऱ्यांचे प्रमाणही कमी असते. या आयएएस अधिकाऱ्यांची नियुक्ती केंद्र सरकारकडून होते. आणि देशाच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्यांना पाठवले जात असते. तरीदेखील या सगळ्या प्रशासकीय नियुयांमध्ये मराठी अधिकाऱ्यांचे प्रमाण कमी राहत आले आहे. मात्र आता हळूहळू हा टक्का वाढतो आहे. यावेळच्या परीक्षेत ६० विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होणे आणि पहिल्या शंभर विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील पाच विद्यार्थ्यांची नावे येणे ही गोष्ट महाराष्ट्र किंवा मराठीच्या गुणवत्तेचा गौरव करणारी ठरते. विशेष म्हणजे आपल्या राज्यामध्ये अशा प्रशासकीय परीक्षांसाठी उत्तम पद्धतीने मार्गदर्शन करणाऱ्या संस्थांची संख्या खूप अल्प आहे. त्या संस्थाही गेल्या दहा ते पंधरा वर्षांमध्ये नावारूपाला आलेल्या आहेत. बरेच मराठी विद्यार्थी हे दिल्लीतील अनेक वर्षे सुरू असलेल्या आणि नावाजलेल्या कोचिंग क्लासेसमध्ये तयारीसाठी जातात. तसे देशभरातूनही या परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी येत असतात. दिल्लीतील विद्यार्थ्यांची तयारी करून घेणाऱ्या या कोचिंग क्लासेसच्या यशस्वी विद्यार्थ्यांची टक्केवारीदेखील मोठी असते. खरेतर महाराष्ट्रातसुद्धा चांगल्या प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची आवश्यकता आहे. यावेळी यशस्वी झालेल्या २२ उमेदवारांना राज्य प्रशासकीय संस्थेने मोलाची मदत केलेली आहे. विशेष म्हणजे अंकिता पाटील या विद्यार्थिनीने देशात १४० वा क्रमांक मिळवून महाराष्ट्राच्या यशामध्ये मोठी भर घातली आहे. उत्तीर्ण झालेल्या महाराष्ट्रातल्या या सगळ्या विद्यार्थ्यांना भारतीय प्रशासन सेवेमध्ये उत्तम कामगिरी करण्याचीदेखील संधी मिळाली आहे.

सरकारी यंत्रणांची कार्यक्षमता ही जशी तेथील कर्मचाऱ्यांवर अवलंबून असते तशीच या यंत्रणांचे संचालन करणाऱ्या आयएएस अधिकाऱ्यांवरही असते. अनेक प्रकारच्या योजना असतात. मग शहरी भागातील विकासकामांबरोबरच ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य किंवा पाणीपुरवठ्याच्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता तितकाच कार्यक्षम प्रशासकीय अधिकारी आवश्यक ठरतो. प्रशासकीय सेवांमध्ये चांगल्या दर्जाचे करिअर करता येते, हे आता आजच्या तरुण पिढीला चांगले समजले आहे. जनसेवा असेल किंवा सामाजिक काम असेल हे स्वयंसेवी पद्धतीने करता येतेच. परंतु प्रशासकीय सेवेत प्रत्यक्ष सहभाग घेऊन सर्वसामान्यांची सेवा अधिक चांगल्या पद्धतीने करता येऊ शकते, हेसुद्धा तितकेच खरे आहे. १९२६ मध्ये ब्रिटिशांच्या काळातच ही परीक्षा पद्धत सुरू झाली होती. २६ जानेवारी १९५० ला भारत प्रजासत्ताक देश झाल्यानंतर या परीक्षा पद्धतीला अधिक संविधानिक रूप दिले गेले. म्हणजे आज ७५ वर्षांपेक्षा जास्त काळ या परीक्षा होत आहेत आणि त्यातून चांगले आणि कार्यक्षमता सिद्ध केलेले अधिकारी लाभू शकले. लोकशाही व्यवस्थेला गरजेची असलेली ही कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा अशा अधिकाऱ्यांमुळेच सुरू राहू शकते. अर्थात सत्ताधाऱ्यांच्या किंवा राजकारण्यांच्या सतत संपर्कात राहावे लागते. नियमबाह्य कामे करून घेण्यासाठी या अधिकाऱ्यांवर दबावही टाकला जातो किंवा त्यांच्या मदतीने गैरव्यवहारही दडपून नेण्याचे प्रकार होतात. तेवढा दुष्परिणाम सोडला तर भारतीय प्रशासकीय सेवा लोकशाहीचा महत्त्वाचा आधार ठरते.

# ढेकू रोडच्या कॉंक्रिटीकरणाला दोन वर्षांत मुहूर्तच नाही; अडीच कोटींचे काम रखडले

## सा. बां. विभाग ठेकेदारावर मेहेरबान? नागरिक त्रस्त; काम सुरू न झाल्यास करणार 'रास्ता रोको'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जांभोरा ते मांडळ या प्रमुख जिल्हा मार्गावरील शहरातील हद्दीत ढेकू रोड कॉंक्रिटीकरणासाठी अमळनेर सार्वजनिक बांधकाम विभागाने ११ मार्च २०२४ रोजी दोन कोटी ३२ लाख ३५ हजार २२० रुपये किमतीचा कार्यारंभ आदेश शहरातील श्रेया कन्स्ट्रक्शनला दिलेला आहे. मात्र, ठेकेदाराला दोन वर्षे होऊनही अद्याप या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण कामाला सुरूवात करण्यासाठी मुहूर्तच सापडला नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे परिसरातील दहा हजार स्थानिक नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने ते कमालीचे हैराण आहेत.



*अमळनेर : शहरातील ढेकू रोडच्या कॉंक्रिटीकरणाला दोन वर्षांत मुहूर्तच न सापडल्याने रस्त्याची झालेली दुरवस्था.*

ढेकू रोड परिसरात १६ महिन्यांपूर्वीच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून भूमिगत गटारीसाठी पाइपलाइन टाकण्याचे काम हाती घेण्यात आले होते. त्यासाठी डांबरी रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. मात्र, गटारीचे काम पाच महिने पूर्णतः रस्ता बंद करून अतिशय संथगतीने करून तात्पुरत्या स्वरूपात मुरूम टाकल्यामुळे ढेकूरोडवासीयांना पावसाळ्यात चिखलाचा सामना करावा लागला. त्यानंतर रस्त्यावर एमपीएमचे निकृष्ट काम करण्यात आले. त्यामुळे खडी सहजपणे निघत असल्याने काही दिवसांतच खड्डे पडत आहेत. या खड्ड्यांमुळे रोज किरकोळ अपघात घडत असून, वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर पसरलेल्या खडीमुळे वाहन चालवणे जिकिरीचे बनले आहे. त्यातच टायर फुटणे, पंक्चर होणे, धुळीचा व पाठीचा त्रास जाणवणे असे प्रकार घडत आहेत. तसेच आबालवृद्धांना ये-जा करणे अवघड झाले आहे. बऱ्याचदा चालताना खडीवरून घसरून अपघात घडून जखमी होण्याच्या घटनाही घडत आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपूर्वीच नव्याने कार्यभार स्वीकारलेल्या सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंत्यांनी या रस्त्याच्या कामासंदर्भात पालिकेचे मुख्याधिकाऱ्यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दोन वर्षांत एकमेव पत्र दिले आहे, हे विशेष! यावरून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आपल्या यंत्रणेच्या अखत्यारीत येत असलेल्या या रस्त्याच्या कामाकडे कशा पद्धतीने डोळेझाक करून ठेकेदाराला अभय देत आहेत, हे स्पष्ट होते. तसेच या पत्रात नमूद केलेले भुयारी गटार योजनेचे काम हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेले असून, ढेकू रोडवरील भुयारी गटार योजनेचे काम १६ महिन्यांपूर्वीच अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण झालेले आहे. यात सदरचा रस्ता वाहतुकीसाठी नागरिकांना खुला करून दिल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपविभागीय अभियंता आर. डी. सूर्यवंशी यांनी सांगितले.

शहरातील हा मुख्य रस्ता असल्याने या रस्त्याने दहा ते बारा गावांची नियमित वाहतूक तसेच धुळे जिल्ह्याकडून अनेक वाहने याच रस्त्याने ये-जा करतात. त्यामुळे मोठी वर्दळ असते. मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी हा रस्ता कॉंक्रिटीकरण करण्याबाबत संबंधित विभागाकडे तक्रारीही केल्या असल्याचे सांगण्यात येते. या कामाबाबत ठेकेदाराने सार्वजनिक बांधकाम विभागाचा काम करण्याचा बारा महिने कालावधीची मर्यादा देखील ओलांडली आहे. ठेकेदार व संबंधित बेजबाबदारपणे आपल्या कामात दिरंगाई करून जनतेस वेठीस धरणाऱ्या अभियंत्यांची प्रशासकीय चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. तसेच जर येत्या १५ दिवसांत या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरूवात न झाल्यास रास्ता रोको करण्याचा इशारा परिसरातील नागरिकांनी दिला आहे.

> सार्वजनिक बांधकाम विभागाचे ढेकू रोड संदर्भातील दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजीचे पत्र कार्यालयास प्राप्त झालेले आहे. या पत्रात नमूद भुयारी गटार योजनेचे काम १६ महिन्यांपूर्वीच एमजेपीने संबंधित ठेकेदाराकडून पूर्ण करून घेतलेले आहे. शहरात सध्या नवीन २४७ पाणीपुरवठा योजनेचे काम सर्वत्र सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांसह योजनेचे ठेकेदार व मी प्रत्यक्ष पाहणी करून सदर योजनेतील ढेकू रोडवरील पाइपलाइन क्रॉसिंगचे काम ठेकेदाराकडून त्वरित करून देण्यात येईल. जेणेकरून प्रलंबित रस्ता कॉंक्रिटीकरण करून नागरिकांना खुला करण्यास मदत होईल.
>
> **– गणेश शिंदे**
> **मुख्याधिकारी, नगर परिषद, अमळनेर.**

> सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालयाचा मी नुकताच कार्यभार स्वीकारला आहे. ढेकू रोड कॉंक्रिटीकरण कामासंदर्भात पालिकेशी पत्रव्यवहार केलेला असून, प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित ठेकेदाराला त्वरित काम सुरू करण्यासाठी आदेशीत करण्यात येईल. तसेच कॉंक्रिटीकरणाचे काम सुरू झाल्यानंतर या रोडवरील वाहतूक पिंपळे व गलवाडे रोडने वळविण्याचे नियोजन देखील करण्यात येईल. जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही.
>
> **– पी. ए.पाटील**
> **अभियंता, सा. बां. उपविभाग, अमळनेर.**

# अंबऋषी टेकडीवरील दाट झाडीत प्रेमचाळे; दामिनी पथकाची कारवाई; चार युगुल ताब्यात

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या काही दिवसांपासून अंबऋषी टेकडीवरील दाट झाडी प्रेमीयुगुलांचा अड्डा बनला आहे. दामिनी पथकाने छापा टाकून चार प्रेमीयुगुलांना पकडल्याची घटना मंगळवार, दि. १० मार्च रोजी दुपारी घडली.

अमळनेर शहराबाहेर पूर्वेला पालिकेची पाणीपुरवठा योजना अंबऋषी टेकडीवर आहे. सामाजिक कार्यकर्त्यांनी हजारो झाडे या ठिकाणी लावल्याने पर्यावरण समृद्ध होऊन ऑक्सिजन पार्क तयार झाला आहे. मात्र, या दाट झाडीचा गैरफायदा घेत अनेक प्रेमीयुगुल दुपारच्या वेळी प्रेमचाळे करायला येतात. १० मार्च रोजी दुपारी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नम्रता जरे यांना फोनवरून माहिती मिळाली. त्यानंतर निरीक्षक निकम यांनी दामिनी पथकातील पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे, नम्रता जरे, उज्ज्वलकुमार म्हस्के, प्रशांत पाटील यांना कारवाईसाठी पाठविले. पथकाने गुपचूप जाऊन चारही बाजूंनी घेरून प्रेमचाळे करणाऱ्या चार तरुणी आणि चार तरुणांना रंगेहात पकडून पोलीस ठाण्यात आणले. पथकाने आपला पोलिसी खाक्या दाखविताच प्रेमीयुगुलांनी ते वडजाई, बिलाडी (ता. जि. धुळे), वसंतनगर (ता. पारोळा), सांगवीतांडा (ता. चाळीसगाव), मोरफड मंगरूळ (ता. पारोळा) येथील असल्याची कबुली दिली. निरीक्षक निकम यांनी त्यांना पोलिसी भाषेत समज देऊन तरुण-तरुणींच्या पालकांना बोलावून त्यांच्या ताब्यात दिले आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे सर्वत्र स्वागत होत आहे.

> शहराबाहेरील पोलीस ठाणे हद्दीत निर्जन स्थळी प्रेमचाळे करणाऱ्यांवर दामिनी पथकाची करडी नजर आहे. मुलींची छेडखानी करणारे तसेच इतर टवाळखोरांवर देखील कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> **– दत्तात्रय निकम**
> **पोलीस निरीक्षक, अमळनेर.**

# राज्य पत्रकार संघातर्फे सोमवारी इफ्तार मिलन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधून समाजात सामाजिक सौहार्द, परस्पर आदर आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उदात्त हेतूने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या येथील शाखेतर्फे भव्य 'हिंदू-मुस्लिम ऐक्य इफ्तार मिलन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. १६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात हा कार्यक्रम होईल.

खासदार खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, प्रांताधिकारी मयुर भंगाळे, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगराध्यक्ष डॉ. परिक्षित बाविस्कर, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, मुख्याधिकारी गणेश शिंदे, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील, डॉ. अनिल शिंदे, मारवडचे सहायक पोलीस निरीक्षक जीभाऊ पाटील आदी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघातर्फे करण्यात आले आहे.

## ट्रिपल तलाक प्रकरण

# सावद्यात ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिल्ह्यातील सावदा शहरातील गौसियानगर परिसरात एका २१ वर्षीय विवाहितेस पतीने मारहाण करून 'तलाक, तलाक, तलाक' असे तीन वेळा उच्चारत घराबाहेर काढल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी संबंधित महिलेच्या तक्रारीवरून सावदा पोलीस ठाण्यात पतीसह एकूण ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार सुमारे तीन वर्षांपूर्वी पीडित तरुणीचा नदीम नजीर खान याच्यासोबत समाजाच्या रितीरिवाजांनुसार निकाह झाला होता. या दाम्पत्याला सालार नावाचा एक वर्षाचा मुलगा आहे. नदीम खान हा मालवाहतूक रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

लग्नानंतर सदर महिला सासरच्या संयुक्त कुटुंबात राहत होती. मात्र, सासरच्या मंडळींकडून तिला वारंवार माहेरहून व्यवसायासाठी तीन लाख रुपये आणण्याचा दबाव टाकला जात असल्याचा आरोप तिने केला आहे. पैसे आणण्यास नकार दिल्यानंतर पतीकडून तिच्यावर वारंवार मारहाण, शिवीगाळ तसेच मानसिक छळ केला जात असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे.

दरम्यान, रमजान महिन्यात पतीने तिला काही दिवसांसाठी माहेरी पाठवले होते. त्यानंतर ९ मार्च रोजी आधार कार्ड शोधण्याच्या कारणावरून तिला पुन्हा सावद्यातील भाड्याच्या घरात बोलावण्यात आले. दुपारी सुमारे तीन वाजता ती घरात गेल्यानंतर पतीने कोणतेही कारण नसताना तिच्यावर शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे.

भांडणाचा आवाज ऐकून शेजारी शेख वाजिद शेख हमीद हे घरात आले असता, त्यांच्या समोरच पती नदीम खान याने 'तलाक, तलाक, तलाक' असे तीन वेळा उच्चारून बेकायदेशीररित्या तलाक दिल्याचे सांगितले. त्यानंतर घराला कुलूप लावून तो निघून गेल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

यानंतर पीडित महिलेने वडिलांना फोन करून संपूर्ण घटना सांगितली. वडील घटनास्थळी येऊन तिला माहेरी घेऊन गेले. कुटुंबीयांशी चर्चा केल्यानंतर अखेर तिने सावदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

या प्रकरणी पती नदीम नजीर खान याच्यासह सासरच्या काही सदस्यांविरोधात कारवाईची मागणी करण्यात आली असून सावदा पोलीस ठाण्यात एकूण ११ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# खंड्या अर्थात किंगफिशर



## पक्ष्यांची ओळख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खंड्या हा लहान-मध्यम आकाराचा, अतिशय रंगीत आणि पाण्याजवळ आढळणारा पक्षी आहे. भारतात तो सामान्यपणे नदी, तलाव, विहीर किंवा शेतीजवळ दिसतो. हा पक्षी अतिशय वेगाने पाण्यात झेप घेऊन मासा पकडण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध आहे.

नाव : खंड्या अर्थात किंगफिशर
आकार : १० ते १२ इंच लाब.
रंग : चमकदार निळसर, मान तपकिरी, पोट पांढरे, शेपूट मयूरपंखी.
चोच : जाड, लांब, लालसर, अणकुचीदार.
डोळे : तपकिरी, तीक्ष्ण, भेदक, पाण्यातील मासे पकडताना अचूक सूर मारून शिकार करतो.
अंडी : मादी मार्च-एप्रिलमध्ये ४५ अंडी घालते. ती उबविण्याचे काम नर व मादी दोघे करतात. अंडी पांढऱ्या रंगाची असतात.
घरटे : खंड्या आपले घरटे झाडावर बांधत नाही. हे घरटे नदीकाठी, तलावाजवळ भुसभुशीत मातीत असतात.
खाद्य : लहान मासे, बेडूक, पाल, विंचू.
खंड्या पक्षी मासेमारी करण्यात पटाईत आहे.
इतर वैशिष्ट्ये : भारतभर आढळतो.
मासा पकडण्यासाठी वेगवान तिरकस सूर मारतो.
दिसायला अत्यंत सुंदर.
आवाज मोठ्याने 'किल किल' करणारा.
कुटुंबवत्सल, नर मादी एकत्र राहतात. एकाच ठिकाणी पंख हलवून स्थिर उडतो.

**संग्राहक : प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्रमंडळ, अमळनेर.**

पान १ वरून...

## थकबाकीदार २३ नागरिकांचे नळ कनेक्शन तोडले

मात्र, संबंधितांकडून रकमेचा भरणा केला जात नव्हता. त्यामुळे अखेर मुख्याधिकारी गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कठोर पावले उचलत थकबाकीदारांची दुकाने सील करणे, नळ कनेक्शन कट करणे आदी प्रकारची धडक कारवाई सुरू केली आहे. बुधवारी वसुली पथकातील कर निरीक्षक लौकिक समशेर, वरिष्ठ लिपीक सतीश बडगुजर, बाळकृष्ण जाधव, सागर पवार, आदित्य संदानशिव, निखिल संदानशीव यांच्या पथकाला थकबाकीदारांचे नळ कनेक्शन बंद करायला पाठविले. काही लोकांनी जागीच थकबाकी भरल्याने त्यांना सवलत देण्यात आली, तर ज्यांनी थकबाकी भरली नाही अशा २३ लोकांचे नळ कनेक्शन तोडण्यात आले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# यशवंतराव चव्हाण : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

भारताच्या स्वातंत्र्योत्तर राजकारणात महाराष्ट्राला दिशा देणाऱ्या नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. १२ मार्च १९१३ रोजी महाराष्ट्रातील देवराष्ट्रे या गावात त्यांचा जन्म झाला. ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे आलेल्या या नेत्याने आपल्या दूरदृष्टी, समन्वयक वृत्ती आणि प्रगतिशील विचारसरणीच्या जोरावर महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकासाला भक्कम दिशा दिली. म्हणूनच त्यांना 'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार' असे संबोधले जाते.

### बालपण आणि शिक्षण

यशवंतराव चव्हाण यांचे बालपण अत्यंत साध्या परिस्थितीत गेले. लहानपणीच वडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांचे संगोपन आईने कष्टाने केले. त्यांच्या आईने शिक्षणाचे महत्त्व त्यांच्या मनात खोलवर रुजवले. प्राथमिक शिक्षण गावात घेतल्यानंतर त्यांनी पुढील शिक्षणासाठी सातारा येथे प्रवेश घेतला. विद्यार्थी जीवनातच त्यांच्यावर राष्ट्रवादी विचारांचा प्रभाव पडला.

### स्वातंत्र्य चळवळीत सहभाग

महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्य चळवळीने त्यांना प्रेरित केले. त्यांनी क्वाईट इंडिया मूहमेंटमध्ये सक्रिय सहभाग घेतला. ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन करताना त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. या काळात त्यांची राजकीय जडणघडण झाली आणि समाजातील प्रश्न समजून घेण्याची दृष्टी विकसित झाली.

### संयुक्त महाराष्ट्र चळवळ आणि नेतृत्व

स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्यांच्या निर्मितीच्या प्रश्नावर महाराष्ट्रात मोठे आंदोलन झाले. या संयुक्त महाराष्ट्र मूहमेंटमध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर ते राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात उद्योग, शेती, शिक्षण आणि सहकार क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.



### मुख्यमंत्री म्हणून कार्य

मुख्यमंत्री म्हणून त्यांनी सहकार चळवळीला मोठे प्रोत्साहन दिले. साखर कारखाने, दूध संघ आणि विविध सहकारी संस्थांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळाले. तसेच सिंचन प्रकल्प, औद्योगिक विकास आणि शिक्षणसंस्था उभारण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यांच्या काळात महाराष्ट्राने प्रगतीचा मजबूत पाया घातला.

### राष्ट्रीय राजकारणातील भूमिका

राज्याच्या पलीकडे जाऊन त्यांनी राष्ट्रीय राजकारणातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. १९६२ च्या सिनो-इंडियन वारनंतर देशाच्या संरक्षण व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी त्यांची भारताचे संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी वित्तमंत्री, गृहमंत्री आणि परराष्ट्रमंत्री अशा अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले. त्यांच्या प्रशासकीय कौशल्यामुळे ते देशातील प्रभावी नेत्यांपैकी एक मानले गेले.

### व्यक्तिमत्त्व आणि विचार

यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते विचारवंत आणि लेखकही होते. सामाजिक समतेवर, शिक्षणाच्या प्रसारावर आणि लोकशाही मूल्यांवर त्यांचा ठाम विश्वास होता. ते समन्वयवादी नेतृत्वाचे उत्तम उदाहरण मानले जातात. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कार्यातून महाराष्ट्राच्या प्रगतीचा भक्कम पाया रचला. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेले निर्णय आजही प्रेरणादायी ठरतात. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा आदर्श घेऊन समाजासाठी काम करण्याची प्रेरणा घेणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

# सुरेल आवाजाची जादू : गायिका श्रेया घोषाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या मधुर, भावपूर्ण आणि बहुगुणी आवाजाने लाखो रसिकांची मने जिंकणारे नाव म्हणजे श्रेया घोषाल. हिंदीसह मराठी, बंगाली, तमीळ, तेलुगू, मल्याळम आणि अनेक भारतीय भाषांमध्ये त्यांनी असंख्य गीते गायली असून, आज त्या भारतातील सर्वांत लोकप्रिय पार्श्वगायिकांपैकी एक मानल्या जातात. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या संगीतप्रवासाचा आढावा घेणे म्हणजे भारतीय संगीतविश्वातील एका अद्वितीय प्रतिभेला अभिवादन करणे होय.

### बालपण आणि संगीताची सुरूवात

१२ मार्च १९८४ रोजी बेहरामपूर येथे श्रेया घोषाल यांचा जन्म झाला. त्यांचे बालपण प्रामुख्याने रावतभाटा येथे गेले. त्यांच्या आई-वडिलांना संगीताची आवड असल्याने लहानपणापासूनच त्यांना संगीताची गोडी लागली. वयाच्या चौथ्या वर्षी त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घ्यायला सुरूवात केली. लहानपणीच त्यांच्या गाण्याची प्रतिभा लक्षात आली. त्यांनी अनेक संगीत स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि त्यात यश मिळविले. विशेषतः सा रे गा मा या लोकप्रिय दूरदर्शन कार्यक्रमात त्यांनी बालगायिका म्हणून सहभाग घेतला आणि विजेतेपद मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

### चित्रपटसृष्टीतील भव्य पदार्पण

त्यांच्या कारकिर्दीतील मोठा टप्पा म्हणजे दिग्दर्शक संजय लीला भन्साळी यांनी दिलेली संधी. २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'देवदास' या चित्रपटातून त्यांनी पार्श्वगायनाची सुरूवात केली. या चित्रपटातील गाणी प्रचंड लोकप्रिय झाली आणि त्यांच्या गाण्याला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. या पहिल्याच चित्रपटासाठी त्यांना नॅशनल फिल्म अ‍ॅवॉर्ड फॉर बेस्ट फिमेल प्लेबॅक सिंगर मिळाला.

### यशस्वी संगीतप्रवास

श्रेया घोषाल यांनी अनेक सुप्रसिद्ध संगीतकारांसोबत काम केले आहे. त्यांच्या आवाजातील मधुरता, भावनांची अभिव्यक्ती आणि शब्दांशी असलेली जवळीक यामुळे त्यांची गाणी श्रोत्यांच्या मनात कायमची घर करून राहतात. हिंदी चित्रपटसृष्टीबरोबरच त्यांनी मराठी, बंगाली, तमीळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम अशा विविध भाषांमध्ये हजारो गीते गायली आहेत. त्यामुळे त्या खऱ्या अर्थाने भारतीय संगीतविश्वातील सर्वभाषिक गायिका म्हणून ओळखल्या जातात.

### पुरस्कार आणि गौरव

आपल्या उत्कृष्ट गायनामुळे श्रेया घोषाल यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी अनेक वेळा राष्ट्रीय पुरस्कार आणि फिल्मफेअर पुरस्कार पटकावले आहेत. त्यांच्या आवाजाने केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध केले आहे.

### व्यक्तिमत्त्व आणि लोकप्रियता

श्रेया घोषाल यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे आणि विनम्र आहे. प्रसिद्धीच्या शिखरावर असूनही त्यांनी आपल्या मेहनतीची आणि संगीतावरील निष्ठेची परंपरा कायम ठेवली आहे. त्यांच्या थेट संगीत मैफिलींनाही जगभरातून मोठा प्रतिसाद मिळतो. संगीत ही भावना व्यक्त करण्याची सर्वांत सुंदर कला आहे आणि त्या कलेला आपल्या सुरेल आवाजाने समृद्ध करणाऱ्या श्रेया घोषाल या भारतीय संगीतविश्वातील अमूल्य संपत्ती आहेत. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या सुरेल प्रवासाला सलाम करताना नव्या पिढीतील कलाकारांना प्रेरणा मिळावी हीच अपेक्षा.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना मंगलमय शुभेच्छा!**



# माहेगाव-देशमुख, कोपरगाव, अहिल्यानगर येथील ऐतिहासिक वाडा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ अर्थात जिजाऊंचे माहेर म्हणजे सिंदखेडराजा येथील जाधवराव. जिजाऊंचे वडील लखुजीराव जाधवराव म्हणजे सतराव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील महाराष्ट्रातील एक मातब्बर सरदार. या लखुजीराव जाधवरावांच्या पुत्राचे म्हणजेच शिवरायांच्या एका मामांचे वंशज हे नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख येथे आहे. जाधवराव घराणे मूळ विदर्भातील सिंदखेडचे. मग इतक्या दूर त्यांची एक वंशशाखा कशी? हा प्रश्न आपल्याला पडतो. याचे उत्तर म्हणजे जाधवरावांकडे असणाऱ्या अनेक वतनांपैकी एक वतन, त्यावेळच्या येथील कुंभारी परगण्याच्या देशमुखीचे.

कोपरगावजवळचे कुंभारी गाव हे मराठेशाहीच्या काळात एका परगण्याचे मुख्यालय होते. या परगण्याची देशमुखी जाधवराव घराण्याकडे होती. जाधवरावांची एक शाखा सिंदखेडहून या कुंभारीत आली आणि गोदावरीकाठच्या या परिसराला तिने आपलेसे केले; परंतु नंतर कुंभारीपासून दोन किलोमीटरवर असणाऱ्या शेजारच्या माहेगाव देशमुख येथे ते स्थलांतरित झाले. त्यामुळे ते 'माहेगावकर जाधवराव' म्हणून ओळखले जातात. माहेगावमध्ये हे घराणे असून त्यांचा येथे वाडा आहे. माहेगावाला 'माहेगाव देशमुख' नाव पडले, ते येथील जाधवराव-देशमुखांमुळेच. गावात जाधवराव देशमुखांचा वाडा आहे. हा वाडा अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात उभारलेल्या वाड्यांसारखाच आहे.



वाड्याचे प्रवेशद्वार आणि त्याच्या काही भिंतीच सध्या तग धरून आहेत. वाड्याचे प्रवेशद्वार त्याच्यावरील नक्षीकामामुळे आपल्याला आकर्षक दिसते. दाराच्या सागवानी चौकटीवर पाने-फुले आणि वेलबुट्ट्या कोरलेल्या आहेत. त्याच्यावर बाहेर आलेल्या तुळ्यांची जी टोके आहेत, त्यावर मोराची नक्षी कोरलेली आपल्याला दिसते. प्रवेशद्वारावरच्या मजल्यावर 'सज्जा' आपल्याला दिसतो. थोडी नजर वर टाकल्यावर सज्जामध्ये असलेले तीन साध्यापद्धतीचे 'गवाक्ष' ही आपल्या नजरेस पडतात.

# सूर्यप्रकाशातून शरीरासाठी व्हिटॅमीन डी मिळण्याची योग्य वेळ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

व्हिटॅमीन डी आपल्या शरीरासाठी फार आवश्यक आहे. याचा सगळ्यात मोठा स्त्रोत सूर्याची किरणे हा आहे. हे व्हिटॅमीन आपल्या शरीरातील कॅल्शियम आणि फॉस्फरस अवशोषित करण्यास मदत करते. जे हाडे आणि दातांच्या मजबुतीसाठी आवश्यक असते. या व्यतिरिक्त व्हिटॅमीन डी इम्यून सिस्टीम चांगली ठेवता येते. ज्यामुळे शरीरात इन्फेक्शन होत नाही आणि आजारांपासूनही बचाव होतो. हृदय आणि ब्लड वेसल्सही चांगल्या राहतात. मानसिक आरोग्य चांगले राहते.

व्हिटॅमीन डी मुळे डिप्रेशन, एन्झायटी आणि अन्य मानसिक आजार बरे होतात. व्यवस्थित ऊन असते. पण बऱ्याच लोकांमध्ये व्हिटॅमीन डीची कमतरता असते. यामागे अनेक कारणे असू शकतात. लाईफ स्टाईलमधील बदल, सूर्याच्या किरणांमध्ये न जाणे यामुळे व्हिटॅमीन डी व्यवस्थित मिळत नाही. एक्सपर्टस् सांगतात, की सकाळी १० ते १२ वाजताची वेळ ही सगळ्यात उत्तम आहे.

यावेळी सूर्याची अल्ट्राव्हायलेट बी किरणे त्वचेवर सरळ पडतात. ज्यातून व्हिटॅमीन डी मिळते. कारण जास्त उन्हात राहिल्यामुळे त्वचा जळू शकते आणि त्वचेचे नुकसान होऊ शकते. म्हणून उन्हात राहताना सावधगिरी बाळगायला हवी. नियमित स्वरूपात उन्हात १५ ते २० मिनिटांचा वेळ घालवायला हवा. ज्यामुळे व्हिटॅमीन डीची कमतरता पूर्ण करता येते. सकाळी ७ वाजता उन्हात व्हिटामीन डी व्यवस्थित मिळते. तज्ज्ञांच्या मते हे पूर्ण बरोबर नाही. कारण ७ वाजता सूर्यकिरणे धरतीवर खूपच कमी येतात. सूर्याची किरणे पृथ्वीपर्यंत पूर्णपणे पोहोचत नाहीत. ज्यामुळे उन्हाचा प्रभाव कमी होतो. इतकेच नाही, तर सूर्यातून निघणारे अल्ट्राव्हायलेट रेज आंशिक स्वरूपात फिल्टर होतात.

# गोंदियाचा पठ्ठ्या झाला साहेब!

## जिद्द, मेहनत आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गोंदिया जिल्ह्यातील एका दुर्गम भागात राहणारा हा मराठी पठ्ठ्या आज सगळ्यांच्या चर्चेत आहे. संघ लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांचा निकाल लागला. त्या निकालात देशभरातून अनेक विद्यार्थ्यांनी बाजी मारली आहे, त्यातील एक चर्चेत असणारे नाव म्हणजे हेमकृष्ण पिसदे! आपल्या महाराष्ट्राच्या मराठी मातीत जन्मलेल्या या वाघाने दाखवून दिलं आहे की जिद्द, मेहनत आणि चिकाटी असेल तर तुमची परिस्थिती काहीही असू द्या, तुमच्या आणि यशाच्या दरम्यान कधीच कुणी येत नाही. हे सिद्ध करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे गोंदियाचा हेमकृष्ण पिसदे.

आदिवासी भागात राहणारा हा तरुण एका दुर्गम भागातून अतिशय गरीब कुटुंबातून येतो. या भागात ना कसल्या सुविधा, ना काही. देशात या भागाला नक्षल भाग म्हणून ओळखला जातो. त्यात घरची परिस्थितीही बेताची होती म्हणून वडिलांनी हेमकृष्णला नोकरीला जाण्याचा आदेश दिला. आई-वडील तसे साधे शेतकरी; पण हेमकृष्णांचे स्वप्न काही तरी मोठे करण्याचे होते. त्याने बाबांचे शब्द पाळले आणि मुंबईत कामगार अधिकारी म्हणून नोकरी केली. त्यांनतर त्याने तहसीलदारपदी नियुक्ती मिळवली. मात्र, देशासाठी काही तरी करण्याचे स्वप्न त्याला शांत बसू देत नव्हते. त्याने यूपीएससीची तयारी सुरू केली.

अमरावतीमध्ये नायब तहसीलदार म्हणून कार्यरत असताना त्याने यूपीएससीच्या स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु ठेवली आणि अतिशय परिश्रमाने यंदाच्या निकालात एआयआर ८३९ रँक मिळविली. त्याने त्याच्या यशावर एक भाष्यही केले आहे. त्याचे म्हणणे आहे, की 'दुर्गम भागात राहत असूनही मोठ्या जिद्दीने अभ्यास केला तर यश नक्की मिळते, हा विश्वास आज सार्थ ठरला. माझ्या यशाचे खरे श्रेय माझ्या पालकांना आणि शिक्षकांना जाते. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून ते गाठण्यासाठी जिद्द आणि आत्मविश्वास ठेवून सातत्याने प्रयत्न केले, तर निश्चितच यश मिळते.'

गरीब शेतकरी घरात आणि आदिवासी भागात जन्मलेला हा पठ्ठ्या, पुढे पुण्यात उच्च शिक्षण घेतो. चारवेळा एमपीएससीच्या परीक्षा उत्तीर्ण करतो आणि शेवटी नायब तहसीलदार असून देशसेवेची वेडापायी एआयआर ८३९ रँकने यूपीएससीसारखी कठीण स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करतो, खरोखर हेमकृष्ण पिसदे, तरुणाईसाठी एक आदर्श ठरतो आहे.


शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# कोणत्याही गुरुवारी करावयाच्या सेवा

## अवश्य करा गुरूवारचे पाच सोपे उपाय, भगवान विष्णूची होईल कृपा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुरु ग्रह ज्याला देवांचे गुरू म्हटले जाते. त्यांचा आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी गुरुवारचा दिवस शुभ आहे. जो कोणी गुरुवारी विधीपूर्वक पूजा करतो त्याला गुरु ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम प्राप्त होतात. हिंदू धर्मात गुरुवार हा भगवान विष्णूला समर्पित आहे. असे मानले जाते, की भगवान विष्णूची पूजा केल्याने सर्वांच्या मनोकामना पूर्ण होतात आणि घरात सुख-समृद्धी येते.

याशिवाय गुरु ग्रह ज्याला देवांचे गुरू म्हटले जाते त्यांचा आशीर्वाद प्राप्त करण्यासाठी गुरुवारचा दिवस शुभ आहे. जो कोणी गुरुवारी विधीपूर्वक पूजा करतो, त्याला गुरु ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम प्राप्त होतात. ज्यामुळे घरामध्ये समृद्धी येते आणि कुंडलीतील गुरु ग्रह बलवान होतो.

गुरु ग्रहाच्या शुभ प्रभावामुळे व्यक्तीचे जीवन सकारात्मकतेने भरलेले असते. कधीही आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत नाही. कामाच्या ठिकाणी मान- सन्मान वाढतो. दीर्घायुष्य प्राप्त होते आणि वैवाहिक जीवनही आनंदी राहते. चला जाणून घेऊया गुरुवारी कोणते उपाय केल्याने तुम्हाला बृहस्पतिसह भगवान विष्णूची कृपा प्राप्त होईल.



### गुरुवारी पिवळे कपडे घालणे शुभ असते.

पत्रिकेतील गुरु ग्रह बलवान होण्यासाठी गुरुवारी पिवळे कपडे घालणे खूप शुभ मानले जाते. भगवान बृहस्पतिला पिवळा रंग खूप प्रिय आहे. अशा परिस्थितीत गुरुवारी पिवळे कपडे परिधान केल्याने साधकाच्या जीवनावर चांगला परिणाम होतो.

### अशा प्रकारे करा भगवान विष्णूची पूजा

भगवान विष्णूच्या पूजेच्या वेळी त्यांना पिवळे फूल अर्पण करावे. भगवान विष्णूला गूळ आणि मसूर अर्पण करा. पंचामृत आणि तुळशीही ठेवा.

### विष्णु सहस्रनामाचे पठण

या दिवशी विष्णु सहस्रनामाचा पाठ करणे अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे सर्व रखडलेली कामे पूर्ण होऊन प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.

### पिंपळ, तुळशी आणि केळीच्या झाडाला पाणी द्यावे

भगवान विष्णूची कृपा प्राप्त करण्यासाठी गुरुवारी पिंपळ, तुळशी आणि केळीच्या झाडांची लागवड करावी. त्यानंतर त्यांची पूजा करावी. यामुळे कुंडलीत गुरु ग्रहाशी संबंधित शुभ परिणाम येऊ लागतात.

### हळद किंवा केशर तिलक

भगवान विष्णू आणि देवगुरु बृहस्पती यांच्या पूजेच्या वेळी हळद किंवा केशराचा तिलक वापरावा. यानंतर स्वतः चंदनाचा टिळा लावावा.



# भगवान जगन्नाथ स्वयं श्रीकृष्ण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पौराणिक मान्यताओं के अनुसार भगवान जगन्नाथ स्वयं श्रीकृष्ण हैं, जो विष्णु के सभी अवतारों के पूर्ण रूप माने जाते हैं। इस चित्र में हम देख सकते हैं कि प्रभु नील जल के भीतर एक विशाल कछुए (कूर्म) पर विराजमान हैं। यह दृश्य हमें समुद्र मंथन की उस पावन कथा की याद दिलाता है जब धैर्य और स्थिरता की आवश्यकता थी।

### कथा का सार

एक समय की बात है, जब देवताओं और असुरों के बीच अमृत प्राप्ति के लिए समुद्र मंथन हो रहा था। मंदराचल पर्वत को मथानी बनाया गया, लेकिन उसे समुद्र की गहराई में थामने के लिए कोई आधार नहीं था। तब भगवान विष्णु ने कूर्म (कछुए) का अवतार लिया और अपनी पीठ पर उस विशाल पर्वत को धारण किया। चित्र की विशेषता-

इस चित्र में भगवान जगन्नाथ उसी कूर्म की पीठ पर सुखपूर्वक विराजमान हैं। उनके बड़े-बडे गोल नेत्र ब्रह्मांड की व्यापकता को दर्शाते हैं। उनके हाथों में शंख, चक्र और अमृत कलश है, जो यह संदेश देता है कि जो भक्त धैर्य (कूर्म का प्रतीक) के साथ जीवन के संघर्षों को झेलता है, प्रभु स्वयं उसे अमृत और मोक्ष प्रदान करते

### सुंदर भाव

"हे जगत के स्वामी आप ही जल में हो, आप ही थल में हो। जब संसार का भार बढ़ता है, तब आप ही आधार बनकर उसे संभालते हैं। कूर्म रूप में आपका धैर्य और जगन्नाथ रूप में आपकी मुस्कान ही भक्त के जीवन का सहारा है।"

### इस चित्र का आध्यात्मिक संदेश

**धैर्य :** कछुआ अपनी धीमी गति और मज़बूत कवच के लिए जाना जाता है। यह हमें सिखाता है कि भक्ति के मार्ग पर संयम रखना ज़रूरी है।

**समर्पण :** जैसे कूर्म ने पूरे पर्वत का भार उठाया, वैसे ही भगवान हमारे जीवन के दुखों का भार स्वयं उठा लेते हैं।

**आनंद :** भगवान जगन्नाथ की मुस्कान हमें विपरीत परिस्थितियों में भी प्रसन्न रहने की प्रेरणा देती है।

# सकारात्मक ऊर्जा अन् आनंदाचे प्रतीक 'रंगपंचमी'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात सण-उत्सवांना विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे आणि त्यातही रंगपंचमीचा दिवस हा सकारात्मक ऊर्जा आणि आनंदाचे प्रतीक मानला जातो. वर्ष २०२६ मध्ये ८ मार्च रोजी रंगपंचमी साजरी केली जाणार आहे. ज्योतिषशास्त्रानुसार हा दिवस केवळ रंगांचा उत्सव नसून आपल्या आयुष्यातील विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी अत्यंत शुभ मानला जातो. जर कोणाच्या विवाहकार्यात अडथळे येत असतील किंवा वैवाहिक जीवनात तणाव असेल, तर या दिवशी काही विशेष उपाय केल्याने लाभ होऊ शकतो, अशी धार्मिक श्रद्धा आहे.



### विवाहातील अडथळे दूर करण्यासाठी उपाय

ज्या तरुण-तरुणींच्या विवाहासाठी योग्य स्थळ मिळण्यास विलंब होत आहे किंवा कार्यात वारंवार अडथळे येत आहेत, त्यांच्यासाठी रंगपंचमीचा दिवस महत्त्वाचा आहे. या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची मनोभावे पूजा करावी. पूजेदरम्यान त्यांना पिवळ्या रंगाचा गुलाल अर्पण करावा. पिवळा रंग हा समृद्धी आणि मांगल्याचे प्रतीक मानला जातो. या उपायामुळे कुंडलीतील गुरु ग्रहाची स्थिती मजबूत होऊन विवाहाचे योग लवकर जुळून येण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.

### प्रेमसंबंधातील समस्यांवर मार्ग

जर तुमच्या प्रेमसंबंधांमध्ये काही कारणास्तव दुरावा निर्माण झाला असेल किंवा वाद होत असतील, तर रंगपंचमीच्या दिवशी राधा-कृष्णाची आराधना करणे फलदायी ठरते. या दिवशी राधा-कृष्णाच्या मूर्तीला किंवा फोटोला लाल रंगाचा गुलाल अर्पण करावा. लाल रंग हा प्रेमाचे प्रतीक आहे. असे केल्याने नात्यातील कटुता संपून पुन्हा एकदा प्रेमाचा ओलावा निर्माण होण्यास मदत मिळते, असे सांगितले जाते.

### पती-पत्नीमधील वाद आणि गृहक्लेश निवारण

वैवाहिक जीवनात आनंदाचा अभाव असेल किंवा पती-पत्नीमध्ये सतत मतभेद होत असतील, तर रंगपंचमीला भगवान शिव आणि माता पार्वती यांची पूजा करावी. या दिवशी महादेवाला भस्म किंवा चंदनाचा तिलक लावून प्रार्थना करावी. या उपायामुळे वैवाहिक जीवनातील नकारात्मकता दूर होऊन पती-पत्नीमध्ये ताळमेळ आणि प्रेम वाढते. घरामध्ये शांती नांदण्यासाठी हा उपाय अत्यंत प्रभावी मानला जातो.

### आर्थिक समृद्धीसाठी गुलाल अर्पण करा

रंगपंचमीच्या दिवशी केवळ आपल्या कुटुंबियांसोबतच नव्हे, तर आपल्या आराध्य दैवतासोबतही रंग खेळण्याची परंपरा आहे. देवाला गुलाल अर्पण केल्याने घरातील वास्तुदोष दूर होतात आणि घरात लक्ष्मीचा वास राहतो. श्रद्धेनुसार, या दिवशी सात्विक रंगांचा वापर करून ईश्वराची भक्ती केल्यास जीवनात सुख-समृद्धीचे आगमन होते.

# शीतला अष्टमी का साजरी होते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



हिंदू धर्मात शीतला अष्टमी या सणाला विशेष महत्त्व आहे. या दिवशी शीतला माता देवीची मनोभावे पूजा केली जाते. २०२६ या वर्षात मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी शीतला अष्टमी सर्वत्र साजरी केली गेली.

धार्मिक परंपरेनुसार शीतला अष्टमी हा दिवस 'बासोडा' म्हणूनही ओळखला जातो. या दिवशी भाविक माता राणीला शिळ्या अन्नाचा नैवेद्य अर्पण करतात आणि स्वतःही शिळे अन्न ग्रहण करतात. असे मानले जाते, की शीतला माता देवीची उपासना केल्याने शरीरातील उष्णता शांत होते आणि विशेषतः देवी, कांजण्या यांसारख्या आजारांपासून संरक्षण मिळते. घरात सुख-शांती आणि आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी महिला या दिवशी व्रत करतात.

पूजेच्या विधीबद्दल सांगायचे झाले तर, शीतला अष्टमी च्या दिवशी पहाटे लवकर उठून थंड पाण्याने स्नान करण्याची प्रथा आहे. त्यानंतर शीतला माता देवीच्या मूर्तीची किंवा प्रतिमेची पूजा केली जाते. पूजेमध्ये प्रामुख्याने दही, रबडी, तांदूळ आणि आदल्या दिवशी बनवलेले पदार्थ अर्पण केले जातात. या दिवशी घरामध्ये विस्तव पेटवला जात नाही, म्हणजेच ताजे अन्न शिजवले जात नाही.

शीतला अष्टमी साजरी करण्यामागे एक खोलवर धार्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन दडलेला आहे. ऋतू बदलाच्या काळात शरीराचे आरोग्य राखण्यासाठी आणि देवीचा आशीर्वाद मिळविण्यासाठी ही परंपरा पिढ्यान्‌पिढ्या जोपासली जात आहे. २०२६ मधील या तिथीला धार्मिक नियमांचे पालन करून विधीवत पूजा केल्यास आरोग्यदायी लाभ मिळतात, अशी श्रद्धा भाविकांमध्ये आहे.

# राशी मंत्र : अर्थ, महत्त्व आणि फायदे

**भाग-३**

### ९. धनु किंवा धनु राशी बीज मंत्र



धनु राशी ही राशीची नववी राशी आहे, ज्याला 'धनू राशी' असेही म्हणतात. धनु राशीवर 'गुरू', ज्याला धन आणि भाग्याचा देव, गुरु म्हणूनही ओळखले जाते, यांचे राज्य असते.

जेव्हा गुरुला प्रसन्न करण्याचा किंवा त्याच्या अनुकूल प्रभावांना वाढवण्याचा विचार येतो तेव्हा धनू राशीचा मंत्र हा सर्वोत्तम पर्याय आहे.

हा मंत्र तुमची वचनबद्धता मजबूत करेल आणि तुम्हाला चांगल्या वातावरणाने वेढेल.

**ॐ ह्रीं क्लीं सौः |**
**ओम ह्रींग क्लींग सौ**

अर्थ- ओम हा विश्वातील सर्वात जादुई ध्वनी असल्याचे म्हटले जाते.

ह्रीम बीज मंत्र हा देवी भुवनेश्वरीला प्रार्थना आहे, ज्याला महामाया असेही म्हणतात.

वैदिक ज्योतिषशास्त्रातील हा राशी मंत्र अत्यंत प्रभावी आहे कारण तो त्याचा जप करणाऱ्या व्यक्तीमध्ये मार्गदर्शनाचे गुण निर्माण करतो.

क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाला आवाहन आहे.

सौह तुमच्या खऱ्या आत्म्याला बोलावतो, ज्याचा अर्थ "मी आहे" असा होतो.

**धनु राशीच्या मंत्राचा जप करण्याचे फायदे**

ज्योतिषशास्त्रानुसार हा राशी मंत्र कठीण काळात मदत करणारा आणि शुभेच्छा देणारा असल्याचे म्हटले जाते.

हे कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता वाढवते आणि तुम्हाला एक मनोरंजक उपस्थिती म्हणून दाखवते.

जर तुम्ही या मंत्राचा जप केला तर तुम्हाला सौभाग्य आणि आर्थिक समृद्धी मिळेल.

शानु राशी मंत्र भक्ताला त्याच्या विचारांवर नियंत्रण ठेवण्यास आणि सिद्धीवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करतो.

शिवाय, हा मंत्र आरोग्याशी संबंधित समस्या कमी करण्यास देखील मदत करतो.

धनु राशीच्या मंत्राचा उच्चार करण्याची उत्तम वेळ कधीही

या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा

धनु राशी मंत्राचा पाठ धनु राशीखाली जन्मलेले लोक कोणत्याही दिशेला

तोंड करून हा मंत्र जप करा.

### १०. मकर किंवा मकर राशीचा मंत्र

ज्योतिषशास्त्राच्या मान्यतेनुसार मकर राशी ही १२ राशींपैकी १० वी राशी आहे.



मकर राशीखाली जन्मलेल्या कोणालाही मकर राशीचा मंत्र आनंदी आणि समृद्ध राहण्यास मदत करतो.

आनंदी वैवाहिक जीवन आणि त्यांच्या जोडीदारासोबत निरोगी नातेसंबंध निर्माण करू इच्छिणाऱ्यांसाठी देखील हे मंत्र फायदेशीर आहे.

सकाळी स्नान केल्यानंतर, मंत्र म्हणा. तुम्ही तुमच्या पूजागृहात किंवा कोणत्याही दिशेने तोंड करून शांत ठिकाणी बसून मंत्र म्हणावा.

**मकर राशीचा मंत्र असा आहे:**
**ॐ ऐं क्लीं ह्रीं श्रीं सौः |**

**ओम आईंग क्लींग हरींग श्रींग सौ**

अर्थ- ओम हा विश्वातील सर्वात रहस्यमय ध्वनी असल्याचे म्हटले जाते.

आयिम बीज मंत्र देवी सरस्वतीचे प्रतिनिधित्व करतो.

क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाला आवाहन आहे.

ह्रीम बीज हा देवी भुवनेश्वरीला अभिवादन आहे.

श्रीम बीज मंत्र हा विपुलता आणि सौभाग्याची देवी महालक्ष्मीचा सन्मान करतो.

सौह तुमच्या वास्तविक आत्म्याला जागृत करतो, ज्याचे भाषांतर "मी आहे" असे होते आणि म्हणून त्याचा शेवट त्याच्याशी होतो.

**मकर राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे**

मकर राशीचा मंत्र उपासकाची समज आणि कौशल्ये विस्तृत आणि सखोल करतो.

हा मंत्र एखाद्याच्या कार्यक्षेत्रात यश मिळवण्यास प्रोत्साहन देतो.

हे अधिक नैतिक व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीत योगदान देते.

हे एखाद्या व्यक्तीला नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे जाणारा आदर्श बदल समजून घेण्यास आणि अंमलात आणण्यास देखील मदत करते.

या मंत्रामुळे ज्ञानाच्या संग्रहालाही चालना मिळते.

मकर राशी मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही

या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा

मकर राशीचा मंत्र मकर राशीखाली जन्मलेले लोक कोणत्याही दिशेला

तोंड करून हा मंत्र जप करा.

### ११. कुंभ किंवा कुंभ राशीचा मंत्र

कुंभ राशी ही १२ राशींपैकी ११ वी राशी आहे.



कुंभ राशीच्या लोकांसाठी कुंभ राशी बीज मंत्राचा जप करण्याची शिफारस केली जाते.

कुंभ राशी बीज मंत्र व्यक्तींना धन, यश, मालमत्ता, काम आणि त्यांचे ध्येय साध्य करण्यात मदत करतो.

सकाळी स्नान केल्यानंतर, मंत्राचा जप करा.

तुम्ही तुमच्या पूजागृहात किंवा शांत ठिकाणी हा मंत्र म्हणावा.

**कुंभ राशीचा मंत्र असा आहे:**
**ॐ ह्रीं ऐं क्लीं श्रीं |**

**ओम ह्रींग ऐंग क्लींग श्रिंग**

अर्थ- ओम हा विश्वातील सर्वात आकर्षक ध्वनी असल्याचे म्हटले जाते.

ह्रीम बीज हा देवी भुवनेश्वरीला अभिवादन आहे.

आयम बीज मंत्र देवी सरस्वतीचे प्रतिनिधित्व करतो.

क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाला आवाहन करतो.

श्रीम बीज मंत्र धन आणि यशाची देवी महालक्ष्मीचा सन्मान करतो.

**कुंभ राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे**

कुंभ राशी मंत्र कामाच्या ठिकाणी प्रभावीपणा वाढविण्यास मदत करतो.

हे नेतृत्व कौशल्यांच्या विकासात मदत करते.

हा राशी मंत्र कौशल्य आणि ज्ञानाच्या विकासात देखील मदत करतो.

ज्योतिषशास्त्रातील हा मंत्र आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या विकासात मदत करतो.

हे एखाद्या व्यक्तीची भावनिक परिपक्वता सुधारते.

हे पैसे आणि यश मिळविण्यात देखील मदत करते.

कुंभ राशी मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही

या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा

कुंभ राशी मंत्र

कुंभ राशीखाली जन्मलेले लोक कोणत्याही दिशेला

तोंड करून हा मंत्र जप करा.

### १२. मीन किंवा मीन राशी बीज मंत्र

पारंपारिक हिंदू चंद्र ज्योतिषशास्त्रानुसार, मीन राशी ही १२ राशींपैकी १२ वी राशी आहे.



वैदिक ज्योतिषशास्त्रातील हा मीन राशी मंत्र राशीच्या व्यक्तीला येणाऱ्या सर्व ज्योतिषीय समस्यांवर मात करण्यासाठी सर्वात महत्त्वाचा मंत्र आहे.

हा मंत्र खूप फायदेशीर आहे आणि धोका टाळण्यास, नोकरी मिळविण्यास आणि वैवाहिक अडचणी सोडवण्यास मदत करतो.

दररोज प्रार्थनेदरम्यान हा मंत्र म्हणता येतो.

**मीन राशीचा मंत्र असा आहे:**
**ॐ ह्रीं क्लीं सौः |**

**ओम ह्रींग क्लींग सौ**

अर्थ- ओम हा विश्वातील सर्वात आध्यात्मिक ध्वनी असल्याचे म्हटले जाते.

ह्रीम बीज हा देवी भुवनेश्वरीला अभिवादन आहे.

क्रीम बीज मंत्र हा भगवान श्रीकृष्णाला आवाहन आहे.

सौह तुमच्या खऱ्या आत्म्याला बोलावतो, ज्याचा अर्थ "मी आहे" असा होतो.

**मीन राशी मंत्राचा जप करण्याचे फायदे**

मीन राशी मंत्र व्यावसायिक आणि उद्योजकीय यशाला प्रोत्साहन देतो. हा मंत्र ज्ञानाच्या विकासात मदत करतो.

हे एखाद्या व्यक्तीला चांगले भाग्य देखील आणते.

हा मंत्र व्यक्तीच्या जीवनात आनंद आणतो.

शिवाय, मीन राशी मंत्र उपासकाच्या व्यावसायिक यशात मदत करतो.

मीन राशी मंत्राचा जप करण्यासाठी सर्वोत्तम वेळ कधीही

या मंत्राचा जप किती वेळा करायचा ११,१०८ किंवा १००८ वेळा

मीन राशी मंत्र

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)